**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ११ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

१) गावांचा विकास आणि सबलीकरण विकसित भारताच्या स्वप्नासाठी आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं राष्ट्रीय पंचायत पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रतिपादन

२) विकसित भारताचं सारथ्य तरुणांच्या हाती असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन; सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनचं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते उद्‌घाटन

३) 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' हा संयुक्त राष्ट्रांचा सर्वोच्च पर्यावरण पुरस्कार ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांना जाहीर

४) विदर्भ गारठला; किमान तापमान १० अंश सेल्सिअसवर

---

**पंचायत पुरस्कार**

ग्रामस्वराज हे महात्मा गांधीजींच स्वप्न होतं. भारतातील मोठी लोकसंख्या आजही खड्यांच्या निवास करते. त्यामुळे गावांचा विकास आणि सशक्तीकरण करणं विकसित भारताच्या स्वप्नासाठी आवश्यक असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांचं आज नवी दिल्लीतील विज्ञान भवन इथं राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण करण्यात आलं त्यावेळी त्या बोलत होत्या. देशभरातील पंचायत राज व्यवस्थेमध्ये सर्वसमावेशक विकास करू पाहणाऱ्या पंचायतींना प्रोत्साहित करण्यासाठी दरवर्षी राष्ट्रीय पंचायत पुरस्कार दिला जातो. विविध श्रेणींमध्ये एकंदर ४५ पुरस्कार देण्यात आले. यामध्ये राज्याला सहा पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील मान्याची वाडी ग्रामपंचायतीने सर्वोत्तम ग्राम पंचायत पुरस्कार तसेच ग्राम ऊर्जा स्वराज विशेष ग्राम पंचायत अशा दोन पुरस्कारांवर आपलं नाव कोरल आहे. तर, गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा पंचायत गटाला सर्वोत्तम

पंचायत गट हा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. याशिवाय, नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी गट अंतर्गत मोडाळे ग्रामपंचायतीला स्वच्छ आणि हरित ग्राम पंचायत हा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त झाला. भंडारा जिल्ह्यातील बेला ग्रामपंचायतीला कार्बन न्यूट्रल विशेष पंचायत पुरस्कारा अंतर्गत तृतीय क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला.

*नेट झिरो कार्बन उत्सरजित प्राप्त करणे कि दिशा मे उत्कृष्ट प्रदर्शन करणे वाली ग्राम पंचायत को दिया जाता है. कार्बन न्युट्रल  विशेष पुरस्कार महाराष्ट्र के भंडारा जिल्हे कि बेला  ग्राम पंचायत को वर्ष २०२४ का कार्बन NUTRIAL का पुरस्कार प्रदान किया जाता  है.*

यासोबतच  पुण्यातील  यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी या संस्थेलाही पंचायत क्षमता निर्माण सर्वोत्तम संस्था पुरस्कार श्रेणीतील तृतीय क्रमांकाचा पुरस्कार देण्यात आला . यावर्षी राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांच्या स्पर्धेत देशभरातील  २७ राज्यांतून  1.94 लाख ग्रामपंचायती सहभागी झाल्या होत्या. त्यामधील 42 पुरस्कारप्राप्त पंचायतींपैकी 42% पंचायती या महिलांच्या नेतृत्वाखाली आहेत. पंचायती राज मंत्री पुरस्कारप्राप्त पंचायतींच्या नाविन्यपूर्ण आणि परिणामकारक पद्धतींची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचं यावेळी अनावरण करण्यात आलं.

------------------------------------------

स्मार्ट इंडिया हॅकेथॉन

विकसित भारताचं सारथ्य तरुणांच्या हाती असून हॅकेथॉन मधून अनेक शास्त्रज्ञ आणि उद्योजक निर्माण झाले आहेत असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.  स्मार्ट इंडिया हॅकेथॉनच्या देशभरातील विद्यार्थ्यांशी त्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे आज दुपारी संवाद साधला.

*आज का भारत सब के प्रयास से ही  तेज गती से  आगे बढ  सकता है. आप  सभी युवा  इनोवेटर्स  के पास  २१ वी सदी के भारत को देखने का नजरिया कुछ  अलग है और इसलिए आपके  सोल्युशन्स भी अलग होते है. मै  पहले  भी  कई हैकथॉन का हिस्सा रह चुका हूँ और  अपने कभी निराश नहीं किया.*

तत्पूर्वी सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनचं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून आज  उद्घाटन झालं. देशभरात ५१ केंद्रांवर होत असलेल्या या स्पर्धेत ८६ हजाराहून अधिक संघ सहभागी झाले आहेत. यात महाराष्ट्राल्या मुंबई, पुणे, नागपूर आणि कोल्हापूर या केंद्रांचाही समावेश आहे. भारत त्यांच्या समस्यांचं निराकरण करण्यासाठी युवकांकडे आशेन पाहत आहे असं प्रधान यावेळी म्हणाले -

*भारत का जो औद्योगिक इंडस्ट्रियल जगत ग्रुप है वो सब अपने प्रॉब्लेम एफर्ट्स लेके आपके पास आये है. यह कोई ३६ घंटे की इव्हेंट नहीं है. या उसके एक महीने पहले की तैयारी नहीं है २४/७ ,३६५ दिन का प्रयास है. प्रतिदिन धीरे धीरे जब ८थ एडिशन ९थ एडिशन १०थ एडिशन तक जायेंगे तो देश आप ही की और देखना चाहिए की इस बार काउ कौनसी समस्या आयी और उसका हल कैसे निकाला गया.*

नागपूरच्या हिंगणा स्थित  जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयात हॅकेथॉनची सुरुवात झाली आहे. इन्फोसिसचे वरिष्ठ टेक्निकल आर्किटेक्ट शिव सोनी यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या स्पर्धेमधून भारत तंत्रज्ञान क्षेत्रात जगाला मार्गदर्शन करणार असल्याचं ते म्हणाले.या महाविद्यालयात होत असलेल्या सॉफ्टवेअर एडिशन मध्ये  केंद्रीय मंत्रालयाकडून चार समस्या निवारण करण्यासाठीचे प्रस्ताव आले असून त्यासाठी  9 राज्यांतून 120 स्पर्धक, 20 चमू आणि 24 मेंटर या समस्यांवर चर्चा करतील. या हॅकेथॉन मधून विविध उपाययोजना निर्माण होतील आणि याचा लाभ समाजाच्या शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहचणार असा विश्वास जी. एच. रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक सुनील उंटवाले  यांनी यावेळी व्यक्त केला.

---------------------------------------

संसद

लोकसभेत आज रेल्वे (दुरुस्ती) विधेयक 2024 आवाजी मतदानान मंजूर झालं . हे विधेयक रेल्वे अधिनियम 1989 मध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न करणार आहे. रेल्वे बोर्डाची शक्ती वाढवण आणि संस्थेच कामकाज आणि स्वातंत्र्य सुधारण हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे.  दरम्यान, महाराष्ट्रात रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांमध्ये एक लाख ६४ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली

असल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं. राज्यात रेल्वेला प्रत्येक स्थानकावर थांबा देण्यासंदर्भात खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला ते उत्तर देत होते. केंद्र सरकार कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स - ए आय वर नियंत्रण आणणारा कायदा करण्याच्या विचाराधीन असून, यावर सभागृहाचं एकमत अपेक्षित असल्याचं केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज लोकसभेत सांगितलं. दरम्यान, राज्यसभेत आज सत्ताधारी आणि विरोधकांच्या गदारोळामुळे कामकाजात व्यत्यय आला. आज सभागृहाचं कामकाज सुरु होताच विरोधकांनी विविध मुद्यावरुन दिलेले स्थगन प्रस्ताव सभापती जगदीप धनखड यांनी फेटाळून लावले. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी, सभापतींविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावाबद्दल विरोधकांचा निषेध केला.कॉँग्रेस पक्षाने याबाबत माफी मागावी, असं ते म्हणाले

-----------------------------------------

माधव गाडगीळ

युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्रामतर्फे देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' जीवनगौरव पुरस्कार यंदा ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांना जाहीर झाला आहे. जगभरातील एकूण सहा जणांना पुरस्कार जाहीर झाला असून, त्यात गाडगीळ जीवनगौरव पुरस्काराचे मानकरी ठरले. 'चॅम्पियन्स ऑफ द अर्थ' हा संयुक्त राष्ट्रांचा सर्वोच्च पर्यावरण पुरस्कार आहे. सन २००५ पासून जनसमूह आणि पृथ्वीच्या संरक्षणासाठी योगदान देणाऱ्यांना या पुरस्कारान गौरवण्यात येत. आतापर्यंत १२२ जणांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. माधव गाडगीळ संशोधन आणि सक्रिय लोकसहभागाद्वारे पृथ्वीरक्षणासाठी अनेक दशक झटल आहेत. नैसर्गिक संसाधनांच्या रक्षणावरील जनमत आणि अधिकृत धोरणांवर गाडगीळ यांनी केलेल्या कामांचा मोठा प्रभाव आहे. राज्य आणि राष्ट्रीय धोरणांचे परिणाम मूल्यमापन ते समाजातील अगदी शेवटच्या थरातील व्यक्तींना पर्यावरणाशी जोडणे, अशा कामांचा यात समावेश आहे.

-----------------------------------------

रेल्वे

सर्वसामान्य प्रवाशांची गरज लक्षात घेऊन मध्य रेल्वे प्रशासनाद्वारा पाचही विभागातून धावणाऱ्या तब्बल 84 मेल, एक्स्प्रेस गाड्यांना लवकरच अतिरिक्त दोन जनरल डबे जोडले जाणार आहेत. एकूण 168 डबे वाढणार असून अतिरिक्त डबे वाढल्यान तब्बल 15 हजार 120 सर्वसामान्य प्रवाशांचा प्रवास सुकर होणार आहे.

-----------------------------------------

राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र

भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्रालयाद्वारे महाराष्ट्र राज्यासाठी राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र शाखा आणि मेट्रोपोलीटन सर्वेलन्स यूनिट, नागपूर महानगरपालिकेमध्ये स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. मनपाच्या के.टी. नगर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीमध्ये मेट्रोपोलीटन सर्वेलन्स यूनिट सुरु करण्यात येणार आहे, अशी माहिती मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांनी दिली. यासंदर्भात राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र दिल्ली, आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग, मुंबई आणि नागपूर महानगरपालिका यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे.

-----------------------------------------

तापमान

विदर्भात थंडीचा जोर वाढला असून अनेक जिल्हयात किमान तापमान १० अंश सेल्सिअस इतकं राहील. यंदाच्या मोसमातील आजचा दिवस सर्वाधिक थंड राहिला. विदर्भात सर्वात कमी किमान तापमानाची नोंद गोंदिया इथं ९ पूर्णांक ४ अंश सेल्सियस इतकी करण्यात आली असून अमरावती जिल्हयातील चिखलदरा इथं किमान तापमान ६ अंश सेल्सिअसच्या खाली गेलं आहे. दरम्यान अमरावती जिल्हयात किमान तापमान १२ पूर्णांक ५, गडचिरोलीत १० पूर्णांक ४, भंडारा इथं ११ पूर्णांक ४ तर वर्धा इथं किमान तापमान १० अंश सेल्सिअस इतकं राहील. नागपुरात आज १० अंश सेल्सियस इतकं किमान तापमान आहे. अनेक दिवसांच्या ढगाळ वातावरणानंतर पुन्हा थंडी परतली आहे. नागपूर प्रादेशिक हवामान विभागाच्या अंदाजानुसार आगामी काही दिवस हवामान थंड आणि कोरडं राहणार आहे.

-----------------------------------------

**रौप्य पदक**

**कलिंगा स्टेडियम भुवनेश्वर इथं सुरू असलेल्या ३९ व्या राष्ट्रीय ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेत नागपूरच्या जान्हवी हिरुडकर हिला १००० मी. स्पर्धेत रौप्य पदक प्राप्त झालं आहे. जान्हवीन हे अंतर २.४८.५९ मिनिटात पूर्ण केल. हरियाणाची संजना सिंग ही पहिल्या क्रमांकावर राहिली. नुकत्याच लखनऊ येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय स्पर्धेत जान्हवीला दोन सुवर्णपदक आणि उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार प्राप्त झाला होता.**

**------------------------------------------**